**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडनवीस यांचा आज शपथविधी

- अदानी लाचखोरी प्रकरणी संयुक्त संसदीय समितीतर्फे चौकशी करण्याची विरोधकांची मागणी

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबई महापालिकेची जय्यत तयारी

**आणि**

- महिला क्रिकेटमधे, ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारत पराभूत

**<><><><>**

राज्याचे मुख्यमंत्री म्हणून भाजपा नेते देवेंद्र फडनवीस यांचा शपथविधी आज होणार आहे. मुंबईत आझाद मैदानात आज संध्याकाळी साडे पाच वाजता होणाऱ्या या समारंभात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, फडनवीस यांना पद आणि गोपनियतेची शपथ देतील. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह इतर केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीशासित राज्यांचे मुख्यमंत्री यावेळी उपस्थित राहणार आहेत.

या शपथविधी सोहळ्यासाठी आझाद मैदानावर तयारी करण्यात आली आहे. मैदान आणि सभोवतालचा परिसर सुशोभित करण्यात आला आहे. या

शपथविधी सोहळ्यासाठी देशभरातून भाजपाचे नेते आणि पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यासाठी भाजपाशासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत. शपथविधी सोहळ्यामुळे मुंबईतल्या वाहुतकीच्या मार्गांत बदल करण्यात येऊन ती इतरत्र वळवण्यात आली.

**<><><><>**

झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी आज मंत्रिमंडळाचा विस्तार केला. रांची इथं राजभवनात झालेल्या समारंभात झारखंडचे राज्यपाल संतोष कुमार गंगवार यांनी मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. झारखंड मुक्ती मोर्चाचे ६, काँग्रेसचे चार तर राष्ट्रीय जनता दलाचा एक असे हे मंत्रिमंडळातले ११ मंत्री आहेत.

**<><><><>**

अदानी लाचखोरी प्रकरणी आज संसदेच्या परिसरात विरोधी पक्षांनी जोरदार निदर्शने केली. विरोधी पक्ष नेता काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्यासह राजद, डीएमके आदी प्रमुख विरोधी पक्षांनी निदर्शनं केली या प्रकरणाची संसदेच्या संयुक्त समितीतर्फे चौकशी करण्याची मागणी यावेळी विरोधकांनी केली. विरोधी पक्षांनी संसदेत केलेला गोंधळ म्हणजे केवळ नाटक आहे, अशी प्रतिक्रिया केंद्रीय मंत्री गिरीराज सिंग आणि किरेन रिजिजू यांनी वार्ताहरांना दिली.

राज्यसभेत आज परदेशातून देशहितावर होत असलेल्या हल्ल्यांचा मुद्दा भाजपा खासदार सुधांशु त्रिवेदी यांनी शून्य प्रहरात उपस्थित केला.

त्यावर हा गंभीर मुद्दा असल्याचं सांगत त्यावर अधिक वेळ चर्चा करण्याची सूचना अध्यक्ष जगदीप धनखड यांनी केली. याला विरोधी पक्षाच्या खासदारांनी जोरदार आक्षेप घेतला. त्यानंतर झालेल्या गोंधळात राज्यसभेचं कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. त्यानंतर पुन्हा कामकाजाला सुरुवात झाली.

आज लोकसभेचं कामकाजही आधी दुपारी दोन वाजेपर्यंत, आणि नंतर दुपारी ३ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. त्याआधी अहिल्या नगर ते पुणे इंटरसिटी रेल्वेमार्गाचे काम लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी केली. हे काम केवळ मेंन्टनन्स पॉईंट उपलब्ध नसल्याने अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. या मार्गावर अनेक धार्मिक स्थळ तसेच औद्योगिक क्षेत्रे असून रेल्वेमार्ग पूर्ण झाल्यास सामान्य जनतेचा प्रवास अधिक सुकर होईल असं ते म्हणाले.

नागरी हवाई वाहतूक मंत्री किनजारापु राम मोहन नायडू यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं की, देशात सध्या १५७ विमानतळं कार्यरत असून २०१४ मध्ये केवळ ७४ विमानतळंच कार्यरत होती. सरकार देशात विमानतळाच्या जाळ्याला महत्त्व देत असल्याचंही ते म्हणाले. सध्या दिवसाला पाचलाख जण देशातंर्गत प्रवास करत असल्याचंही त्यांनी सांगितलं.

<><><><>

संभल इथल्या हिंसाचाराबद्दल एकांगी माहिती समाजमाध्यमांवर पसरवल्याप्रकरणी भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी आज लोकसभेत काँग्रेस पक्षाच्या नेत्यांवर आरोप केले, त्यानंतर विरोधी पक्षांनीही अदानी समुहावरच्या आरोपांप्रकरणी चौकशीची मागणी करत गदारोळ केला. त्यामुळे सभापतींनी कामकाज २ वाजेपर्यंत तहकूब केलं.

विकसित भारताच्या उद्दिष्टाकडे वाटचाल करताना देशाच्या आर्थिक, सामाजिक मूल्यांवर परदेशी संस्थांकडून दोषारोप होत असल्याचा मुद्दा राज्यसभेत शून्य प्रहरात भाजपचे खासदार सुधांशु त्रिवेदी यांनी मांडला, त्यांना बोलण्यासाठी राज्यसभा अध्यक्ष जगदीश धनखड यांनी अधिक वेळ दिल्याबद्दल विरोधी पक्षांनी आक्षेप घेत गदारोळ केला त्यामुळे अध्यक्षांनी कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब केलं.

**<><><><>**

नैसर्गिक आपत्ती, हवामान बदल तसंच नैसर्गिक स्त्रोतांचा गैरवापर या समस्यांपासून शेतकऱ्यांना वाचवण्यासाठी देशातल्या कृषिशास्त्रज्ञांनी नवीन योजना विकसित कराव्या, असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. त्या आज भुवनेश्वर इथे ओडिशा विद्यापीठाच्या ४० व्या दीक्षांत समारंभात बोलत होत्या. सुपीक जमीन, कुशल मनुष्यबळ, शेतीयोग्य हवामान आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या बळावर भारताने गेल्या काही वर्षांत कृषिक्षेत्रात मोठी प्रगती केली असून २०४७ पर्यंत विकसित भारताचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कृषिशास्त्रज्ञांचं योगदान खूप महत्वाचं ठरणार आहे असं त्या म्हणाल्या.

**<><><><>**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यभरातून येणाऱ्या अनुयायांना सुविधा पुरवण्यासाठी मुंबई महापालिकेनं जय्यत तयारी केली आहे. पालिकेनं चैत्यभूमी परिसरात नियंत्रण कक्ष उभारला असून रुग्णवाहिका, आरोग्य सेवा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता, शौचालये अशा सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. चैत्यभूमी परिसरात लावलेल्या एलईडी स्क्रीनवर मुख्य कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण पाहण्याची सोय केली आहे. चैत्यभूमी जवळच्या समुद्रात जीवरक्षक बोटी, अग्निशमन यंत्रणाही तैनात केली आहे. या वेळी पालिकेच्या जनसंपर्क विभागानं बाबासाहेबांच्या जीवनपटावर आधारित छायाचित्र प्रदर्शन आयोजित केलं आहे.

<><><><>

महिला क्रिकेटमधे, भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातल्या एकदिवसीय मालिकेत, आज ब्रिस्ब्रेन इथं झालेल्या पहिल्या सामन्यात भारताला पराभव पत्करावा लागला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारताचा संघ ३५ व्या षटकातच १०० धावा करुन गारद झाला. मेगन स्कट हिनं पाच बळी घेतले. तर किम गर्थ, ॲश्ले गार्डनर, ॲनाबेल सुदरलँड आणि ॲलेना किंग यांनी प्रत्येकी एकबळी मिळवला.

ऑस्ट्रेलियानं सतराव्या षटकात पाच गड्यांच्या मोबदल्यात ही धावसंख्या पार केली. जॉर्जिया ओलच्या नाबाद ४६, आणि फिबी लिचफिल्डच्या ३५ धावांच्या बळावर ऑस्ट्रेलियानं विजय साकार केला. भारतातर्फे रेणुका सिंहनं तीन तर प्रिया मिश्रानं दोन गडी बाद केले.

<><><><>

ओमानमध्ये झालेल्या पुरुषांच्या हॉकी ज्युनियर आशिया चषक स्पर्धेचं विजेतेपद भारतीय संघानं पटकावलं आहे. काल झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानचा ५ - ३ असा पराभव केला. या संपूर्ण स्पर्धेत अपराजित राहिलेल्या भारतीय संघानं सलग तिसऱ्यांदा हे विजेतेपद पटकावलं आहे.

याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारतीय संघाचं अभिनंदन केलं. हा विजय भारतीय हॉकी संघासाठी ऐतिहासिक क्षण असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. खेळाडूंचं अतुलनीय कौशल्य, धैर्य आणि सांघिक कामगिरीच्या जोरावर भारतानं हा विजय साकारला, असं म्हणत प्रधानमंत्र्यांनी हॉकी संघाच्या भविष्याबद्दल शुभेच्छा व्यक्त केल्या.

**<><><>**

सिंगापूर इथं सुरु असलेल्या, यंदाच्या फिडे जागतिक बुद्धीबळ स्पर्धेत, भारताच्या डी. गुकेश आणि चीनच्या डिंग लेरेन यांच्यातली आठवी फेरीही अनिर्णित राहिली. दोघांनाही प्रत्येकी ४ गुण मिळाले असून त्यांच्यातील अनिर्णित राहिलेली ही सलग पाचवी फेरी  आहे. त्यांनी आतापर्यंत एक एक गेम जिंकला असून त्यांचे ६ गेम अनिर्णित राहिले आहेत. या स्पर्धेचं अजिंक्यपद जिंकण्यासाठी दोघांनाही प्रत्येकी ३ पूर्णांक ५ दशांश गुणांची आवश्यकता आहे.

**<><><>**

स्वातंत्र्य सेनानी डॉ.बापू लाड यांच्या नावे दिला जाणारा यंदाचा क्रांतिअग्रणी पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. भालचंद्र नेमाडे यांना प्रसिद्ध दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांच्या हस्ते देण्यात आला. एक लाख रुपये, मानचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. सांगली जिल्ह्यात पलूस तालुक्यातल्या कुंडल इथं हा पुरस्कार वितरण समारंभ झाला.

**<><><><>**

छत्रपती संभाजीनगरातल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. बलभीम मारुतीराव पाटोदेकर यांचं काल वृद्धापकाळानं निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. आज सकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. १९८१ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलसचिवपदी निवड झाल्यानंतर त्यांनी कोणत्याही दबावाला न जुमानता विद्यापीठातले गैरप्रकार मोडीत काढले होते.

**//<><><><>//**